दि. 30/03/2023

सकाळ पू. पान क्र. 1

नवनियुक्त पोलिस उपायुक्त पौर्णिमा चौगुले यांचा निर्धार

# शहर सुरक्षा व्यवस्थेवर भर देणार

नालासोपारा, ता. २९ (बातमीदार) : मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालय परिमंडळ २ च्या पहिल्या महिला पोलिस उपायुक्त म्हणून पौर्णिमा चौगुले यांनी बुधवारी पदभार स्वीकारला आहे. पदभार स्वीकारताच त्यांनी सर्वाधिक गुन्हेगारीची नोंद होणाऱ्या तुळिंज पोलिस ठाण्यात भेट दिली. परिमंडळ महिलांच्या अत्याचारांचे वाढते प्रमाण लक्षात घेता महिलांची सुरक्षा अग्रस्थानी ठेवून, शहराची रचना लक्षात घेत गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी प्रयत्न करणार आहे, असे पोलिस उपायुक्त पौर्णिमा चौधरी यांनी 'सकाळ'ला सांगितले.



नालासोपारा : पदभार स्वीकारल्यानंतर तुळिंज पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्यांशी उपायुक्त पौर्णिमा चौगुले यांनी चर्चा केली.

मुंबईच्या वेशीवर उपनगर म्हणून वसई, विरार, नालासोपारा, आणि मिरा भाईंदरची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. नालासोपारा शहरात लोकसंख्या वाढत असून येथे गुन्हेगारीचे प्रमाण ही सर्वाधिक आहे. परिमंडळ २ च्या हद्दीत नालासोपारा पूर्व तुळिंज, आचोळा, वालीव आणि नव्याने निर्माण झालेले नायगाव, माणिकपूर, वसई अशी सहा पोलिस ठाणी येतात. त्यापैकी तुळिंज, आचोळा, वालीव, आणि नायगाव या पोलिस ठाणे हद्दीत गुन्हेगारीचे प्रमाण सर्वाधिक आहे. या गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करणे हे नवनियुक्त पोलिस उपायुक्तांसमोर समोर आव्हान आहे. या भागातील गुन्हेगारीवर अंकुश लावण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे चौगुले यांनी सांगितले.

नाशिकवरून बदली झाल्यानंतर २ मार्चला मिरा-भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालयात हजर झाले. सध्या परिमंडळ २ चा पदभार स्वीकारला आहे. आता दोन दिवसांत शहराची रचना, गुन्हेगारीचे स्वरूप लक्षात घेऊन, पोलिस दलातील 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या ब्रीद वाक्याला अनुसरून मी काम करणार आहे. महिलांच्या सुरक्षेला सर्वाधिक मी प्राधान्य देणार आहे.
- **पौर्णिमा चौगुले**, पोलिस उपायुक्त, परिमंडळ ०२

पुढारी पू. पान क्र. 2

# विरारमध्ये एकाच दिवसात ३० पोलिसांची वाहने जप्त

## लेडी सिंघमने पोलिसांनाच लावली शिस्त

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

कायदा हा सर्वांना समान असतो मग तो पोलीस असो की अन्य कुणीही... विरार शहरात सध्या एक महिला वाहतूक पोलीस चर्चेत आहे. प्रज्ञा दळवी असे या महिला वाहतूक पोलिसाचे नाव आहे. दळवी यांनी रस्त्यावर बेकायदेशीररित्या उभ्या असलेल्या वाहनांवर धडक कारवाई सुरू केली आहे. विशेष म्हणजे ही कारवाई करतांना त्यांनी पोलिसांच्या गाड्यांनाही सोडले नाही. एकाच दिवसात त्यांनी पोलिसांच्या ३० गाड्या जप्त केल्या आहेत. त्यामुळे आता पोलिसांनाही वाहतूक पोलीस प्रज्ञा दळवी यांची जरब बसली आहे.



विरार शहरातील रेल्वे स्थानक परिसरात बेशिस्तपणे वाहने उभी केली जातात. त्यामुळे वाहतूक कोंडी होते. अशा वाहनांवर कारवाई करण्यासाठी प्रज्ञा दळवी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जे वाहन बेकायदेशीररित्या उभे असेल ते कुणाचेही असले तरी प्रज्ञा दळवी त्या टोईंग करून जप्त करत आहेत. नियमानुसार कारवाई करताना त्या कुणालाच सोडत नाही. विरार पोलिसांच्या गाड्या रस्त्यावर उभ्या असतात. दळवी यांनी पोलिसांच्या गाड्याच जप्त करण्यास सुरवात केली आहे. एकाच दिवसात त्यांनी तब्बल ३० पोलिसांच्या दुचाकी जप्त केल्या. गाडी उचलण्याच्या म्हणजे टोईंगचा २०० रुपये आणि दंड ५०० रुपये अशी एकूण ७०० रुपयांची ही दंडात्मक कारवाई केली जात आहे.

माझ्यावर दबाव आला पण नियम सर्वांना सारखाच असल्याने मी कारवाई करते असे दळवी म्हणाल्या. पोलिसांच्या गाड्यांवर आजवर कुणीही कारवाई केली नव्हती. या 'लेडि सिंघम दळवींचे कौतूक होतेय.

CamScanner

Scanned with CamScanner

दि. 30/03/2023

लोकमत पू. पान क्र. 1



काशिमीरा पोलिसांनी घरफोडीच्या गुन्ह्यातील चोरट्याला १० तासांत अटक केली. हस्तगत केलेला २३ लाखांचा मुद्देमाल दाखविताना पोलिस.

# चोरीनंतर देवदर्शनाआधी चोरास पोलिसांचेच दर्शन

## सराईतास २३ लाखांच्या मुद्देमालासह अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** तब्बल ४० गुणेच दाखल असलेल्या सराईत घरफोड्यास काशिमीरा पोलिसांनी एका घरफोडीच्या गुन्ह्यात १० तासांत अटक करून चोरलेला २३ लाखांचा मुद्देमाल हस्तगत केल्याची माहिती मीरा-भाईंदर परिमंडळ १ चे पोलिस उपायुक्त जयंत बजबळे यांनी दिली. ठाणे न्यायालयाने शेख याला ३१ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. मोठा ऐवज हाती लागल्याने चोरटा हा राजस्थानच्या अजमेर येथे पळून जाण्याच्या तयारीत होता. गुन्ह्यात मोठे घबाड लागल्यावर तो दर्शनासाठी अजमेर येथे जात असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली.

मीरा रोडच्या दहिसर चेक नाका येथील डीबी ओझोनमध्ये राहणारे अकबर अली मोहम्मद अली यांच्या घराच्या ग्रिलचे लोखंडी गज कापून चोरट्याने १४ लाख ६५ हजारांचे २९३ ग्रॅम सोन्याचे दागिने, १ किलो वजनाचे ७० हजारांचे सोन्याचे दागिने आणि ९ लाख रोख असा एकूण २४ लाख ३५ हजारांचा ऐवज चोरून नेला होता.

काशिमीरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर अब्दुल शेख उर्फ अब्दुल चिरा (४६) याने गुन्हा केल्याची माहिती मिळाली. प्रशांत गांगुर्डे आणि पोलिस पथकाने कारवाई केल्याचे उपायुक्त जयंत बजबळे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

### घरफोडीचे ४० गुन्हे

- पोलिसांनी नालासोपारा रेल्वे स्थानक भागातून त्याला अटक केली. शेख हा मूळचा दिल्लीचा आहे. पळून जाण्याच्या तयारीत असताना पथकाने त्याला पकडले.
- त्याच्याकडून २३ लाख १६ हजारांचे दागिने, रोख असा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले. त्याच्यावर मुंबई, ठाणे, पालघर, अजमेर - राजस्थान आदी भागात गुन्हे दाखल आहेत.

# महिना आठ हजार द्या आणि गुटखा विक्री करा

## हप्ता मागणाऱ्या पोलिसाला पंटरसह अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** बंदी असलेल्या गुटख्याची विक्री करायची असेल, तर पोलिसांना दर महिन्याला आठ हजार हप्ता देऊन बिनबोभाट गुटखा विक्री करा, असे दर्शविणारा प्रकार भाईंदरमध्ये उघड झाला असून नवघर पोलिस ठाण्यातील हवालदारास त्याच्या पंटरसह १० हजारांची लाच घेतल्याप्रकरणी ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली.

भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ४० वर्षीय तक्रारदाराचे भाड्याचे जनरल स्टोअर आहे. तो पूर्वी गुटखा विक्री करत होता, मात्र सध्या गुटखा विक्रीचा धंदा बंद केला आहे, तरीही पोलिस हवालदार अमित एकनाथ पाटील (वय ३८) याने तक्रारदाराकडे गुटखा विक्रीचे मागील महिन्याचे ८ हजार व चालू महिन्याचे ८ हजार असे १६ हजार मागितले. २७ मार्चला तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली.

पोलिस अधीक्षक सुनील लोखंडे व अपर पोलिस अधीक्षक अनिल घेरडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक स्वप्निल जुईकरसह परदेशी, पवार, निवले, पारधी, शेख, सांवरे यांच्या पथकाने पडताळणी सुरू केली. पडताळणीत पाटीलसमोर त्याचा पंटर संजय यादव याने तक्रारदाराकडे पैशांची मागणी केली, तर पुढील बोलणी मिश्रा याच्याशी करण्यास त्याने सांगितले. तडजोडी अंती १० हजार रुपये देण्याचे ठरले. बुधवारी, २९ मार्चला मिश्रा याला गौरवधर्म काटा येथील कार्यालयात १० हजार घेताना पकडले. त्यानंतर हवालदार पाटील यालाही अटक केली, तर पंटर संजय यादव पसार झाला आहे.

### आयुक्तालयाच्या ग्रुपमध्ये आरोपी

- मीरा भाईंदर -वसई विरार पोलिस आयुक्तालयाचा पत्रकारांसाठी पीआरओ व्हॉट्सॲप ग्रुप आहे. त्या ग्रुपमध्ये अमित मिश्राला पोलिसांनीच समाविष्ट केले असल्याचे आढळून आले.

म.टा. पू. पान क्र. 1

# मिरा-भाईंदरमध्ये करोनासाठी सज्जता

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

मिरा-भाईंदर महापालिका हद्दीत मागील आठवड्याभरात दैनंदिन करोना रुग्णांची संख्या वाढल्याचे दिसत आहे. या रुग्णांमध्ये सौम्य लक्षणे दिसत असल्याने त्यांच्यावर घरीच उपचार केले जात आहेत. या पार्श्वभूमीवर पालिका प्रशासन सतर्क झाले असून रुग्णांना रुग्णालयात दाखल करण्याची गरज भासल्यास आवश्यक तयारी पूर्ण करण्यात आली आहे.

शहरात आठवड्याला एक ते दोन करोना रुग्ण आढळून येत होते. परंतु मागील आठवडाभरात रोज दोन ते तीन बाधित आढळत आहेत. उपचाराधीन रुग्णांची संख्या १८ झाली आहे. या पार्श्वभूमीवर, आरोग्य व्यवस्थेच्या सज्जतेचा आढावा घेण्यासाठी पालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी बैठक घेतली. आगामी काळात रुग्णांना रुग्णालयात दाखल करण्याची गरज भासल्यास आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या. आरोग्य विभागाकडून दिवंगत प्रमोद महाजन सभागृहातील उपचार केंद्रात ऑक्सिजन टाकी व इतर सुविधा तयार ठेवण्यात आल्या आहेत. जोशी रुग्णालयातील करोना कक्ष सुरू केला आहे. घाबरून जाण्याची गरज नसल्याचे मत आरोग्य अधिकाऱ्यांनी व्यक्त केले आहे.

### बाधित रुग्णांची दैनंदिन आकडेवारी

| दिनांक | रुग्णसंख्या |
|---|---|
| २४ मार्च | १ |
| २५ मार्च | २ |
| २६ मार्च | २ |
| २७ मार्च | ३ |
| २८ मार्च | ५ |

CS CamScanner

Scanned with CamScanner

लोकमत पान क्र.1

दि. 30/03/2023

# सर्वोच्च न्यायालयाने सरकारला झापले

## विद्वेषी वक्तव्ये रोखण्याची जबाबदारी राज्यांचीच

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** विद्वेषी वक्तव्ये रोखण्याची जबाबदारी राज्यांचीच असून कारवाईचा बडगा उगारण्यात यंत्रणा अपयशी ठरत आहे. सरकार नपुंसक, शक्तिहीन झाले आहे. ते वेळेवर कोणावरही कारवाई करत नाही. जर हे असेच सुरू राहिले तर या सरकारची गरजच काय, असा थेट सवाल सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी केला. राजकीय नेत्यांनी धर्माचा राजकारणासाठी वापर करण्याचे टाळले तर विद्वेषी वक्तव्येही बंद होतील, असेही न्यायालयाने म्हटले.

महाराष्ट्रात सकल हिंदू समाज या संघटनेने काढलेल्या रॅलींमध्ये विद्वेषी वक्तव्ये करणाऱ्यांविरोधात कारवाई न केल्याबद्दल यंत्रणा व अधिकाऱ्यांविरोधात अवमानाची कारवाई करावी, अशी याचिका न्यायालयात दाखल झाली आहे. विद्वेषी वक्तव्ये करणाऱ्यांविरोधात तक्रार दाखल होण्याची वाट न पाहता व आरोपी कोणत्या धर्माचा आहे याचा विचार न करता अधिकाऱ्यांनी अशा प्रकरणांची दखल घेऊन कारवाई करावी, असे आदेश याआधी सर्वोच्च न्यायालयाने दिले होते.

### ...हे दुष्टचक्र

- खंडपीठाने म्हटले आहे की, राजकीय नेत्यांनी धर्माचा राजकारणासाठी वापर करण्याचे टाळले तर विद्वेषी वक्तव्येही बंद होतील, असे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश के. एम. जोसेफ व न्या. बी. व्ही. नागरत्ना यांच्या खंडपीठाने म्हटले आहे.
- विद्वेषी वक्तव्ये हे एक प्रकारचे दुष्टचक्र असून त्यापासून लोकांनी दूर राहिले पाहिजे, असे खंडपीठाने म्हटले आहे.



### 'नेहरू, वाजपेयींची भाषणे लोक आवर्जून ऐकत'

सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, पं. जवाहरलाल नेहरू, अटलबिहारी वाजपेयी यांची भाषणे ऐकण्यासाठी अगदी दुर्गम भागांतील लोक देखील मोठ्या संख्येने येत असत. मात्र आता राजकीय नेत्यांनी धर्म व राजकारण यांची सरमिसळ केली असून त्याचा लोकशाहीला मोठा धोका आहे. किती लोकांवर कारवाई करायची यालाही एक मर्यादा आहे. काही लोक दरदिवशी इतरांबद्दल व्देष पसरविणारी वक्तव्ये टीव्हीतील कार्यक्रम तसेच सार्वजनिक समारंभांतून करत असतात. त्यापेक्षा अन्य समुदायांविरोधात आम्ही विद्वेषी वक्तव्ये करणार नाही अशी देशांतील नागरिकांनी शपथ घेतल्यास अनेक प्रश्न सुटण्यास मदत होईल.

### 'महासत्ता बनायचे तर आधी कायद्याचा सन्मान राखा'

काही जणांनी केलेली विद्वेषी वक्तव्ये समाजातील मोठ्या घटकाला मान्य नाहीत. पाकिस्तानात चालते व्हासारखी वक्तव्ये विशिष्ट समुदायाला उद्देशून करण्यात आली. इतक्या खालच्या थराला कोणीही जाऊ नये. कोणालाही कायदे मोडण्याचा अधिकार दिलेला नाही. जर तुम्हाला देशाची प्रगती करायची असेल व महासत्ता बनायचे असेल तर आधी कायद्याचा सन्मान करायला शिका.

- सर्वोच्च न्यायालय

### कसा समोर आला मुद्दा?

चार महिन्यांत ५० हिंदू जन आक्रोश मोर्चे महाराष्ट्रात काढले. त्यामुळे विद्वेष पसरविला गेला. त्याविरोधात काहीच कारवाई न झाल्याने अवमान याचिका दाखल केल्याचे याचिकादाराचे वकील ॲड. निझाम पाशा यांनी खंडपीठाला सांगितले होते. त्यावर सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले की, केरळमध्ये एका व्यक्तीने विद्वेषी उद्‌गार काढले. पण याचिकादार शाहिन अब्दुल्ला यांनी अशा उद्‌गारांबद्दल माहिती देताना निवडकच उदाहरणे दिली. त्यानंतर विव्देषी वक्तव्यांबाबतच्या चर्चेला तोंड फुटले.

पुढारी पू. पान क्र. 2

### वसई काँग्रेसतर्फे सत्याग्रह आंदोलन

**विरार :** वसई शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष ओनिल अल्मेडा यांच्या नेतृत्वाखाली मापडी येथील हुतात्मा चौकात काँग्रेसने मोदी सरकारच्या निषेधार्थ मंगळवारी आंदोलन केले. भाजप आणि मोदी सरकारच्या भ्रष्टाचाराविरुद्ध कार्यकर्त्यांनी घोषणा दिल्या. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्यावर गुजरातमध्ये खोट्या केसेस दाखल करून मोदी सरकारने राहुल गांधी यांची खासदारकी रद्द केली. त्याचा निषेध करीत संविधान व लोकशाही वाचविण्यासाठी वसईत एक दिवसीय सत्याग्रह सकाळी ११ ते सायंकाळी ५ वा. पर्यंत करण्यात आला. सरचिटणीस किरण शिंदे, विल्फ्रेड डिसुजा, सहेजाद मलिक, बिना फुर्ट्याडो रामदास वाघमारे, अर्षद डाबरे, प्रविणा चौधरी, निखिलेश उपस्थित होते.

CamScanner
Scanned with CamScanner

म.टा. पान क्र.5

दि. 30/03/2023

# संपकाळातील अनुपस्थिती नियमित होणार

## सामान्य प्रशासन विभागाचा निर्णय

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई



जुन्या पेन्शन योजनेच्या मागणीसाठी राज्यभरातील सरकारी, निमसरकारी, त्याचप्रमाणे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपकाळात गैरहजर असलेल्या कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती असाधारण रजा म्हणून नियमित करण्याचा निर्णय राज्य सरकारने बुधवारी सरकार निर्णयाच्या माध्यमातून जाहीर केला. मात्र सरकारच्या या निर्णयावर काही संघटनांनी नाराजी व्यक्त केली. संपकाळातील सात दिवसांचा पगार कापला जाणार असल्याची भीती व्यक्त करीत या शासन निर्णयात बदल करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

जुन्या पेन्शन योजनेच्या मागणीसाठी राज्यातील सरकारी, निमसरकारी आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी १४ ते २० मार्चदरम्यान संप केला होता. या संपात सुमारे १४ लाख कर्मचारी सहभागी झाले होते, असा दावा कर्मचारी संघटनांनी केला. संप मागे घेण्याची बोलणी करताना संपकाळातील गैरहजेरी रजेत परावर्तित करण्यात येईल, अशी ग्वाही प्रशासनातर्फे देण्यात आली. त्यानुसार बुधवारी यासंदर्भातील सरकार निर्णय जाहीर करण्यात आला. या निर्णयानुसार संपकाळातील गैरहजेरी असाधारण रजेत समाविष्ट करण्याच्या निर्णयामुळे लाखो कर्मचाऱ्यांची सेवा खंडित होण्यापासून वाचली आहे. या निर्णयाचे काही संघटनांनी स्वागत केले असले, तरी काही संघटनांनी मात्र या निर्णयात बदल करण्याची मागणी केली.

राज्य सरकारी, निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समिती, महाराष्ट्राच्या वतीने समितीचे निमंत्रक विश्वास काटकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन देत लक्ष वेधले. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनानुसार, संप कालावधीत एक विशेष बाब म्हणून कर्मचारी, शिक्षकांकडे शिल्लक असलेली रजा मंजूर करून नियमित करावी व त्यानुसार सरकार निर्णयात बदल करावेत. आपण दिलेल्या आश्वासनाशी सरकार निर्णय विसंगत आहे, असे पत्रात नमूद केले आहे. असाधारण रजा म्हणजे संपकाळातील सरकारी सेवेत खंड पडणार नाही. पण संपकाळातील वेतन कापले जाणार आहे. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी १९७६-७७मध्ये ५४ दिवसांचा विक्रमी संप पुकारला होता. तेव्हा संपकाळातील दिवसांचे कर्मचाऱ्यांनी वाढीव तास काम केले होते. त्यामुळे ५४ दिवसांचे वेतन कापले नव्हते, पण आता आठ दिवसांचे वेतन कापले जाणार आहे, याकडे संघटनेच्या नेत्यांनी लक्ष वेधले. त्यामुळे आता यासंदर्भात राज्य सरकार काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

### १० कोटींचा विशेष निधी

महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघासाठी वांद्रे उपनगरातील शासकीय भूखंडावर निर्माण करण्यात येणाऱ्या कल्याण केंद्राच्या बांधकामासाठी १० कोटी रुपयांचा निधी विशेष बाब म्हणून काही अटी व शर्तींवर उपलब्ध करून देण्याचा निर्णय सामान्य प्रशासन विभागाने घेतला आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पुरवणी मागणीतून सामान्य प्रशासन विभागाला मंजूर करण्यात आलेल्या निधीतून ही रक्कम दिली जाणार आहे. या संपात मध्यम मार्ग निघण्यासाठी राजपत्रित अधिकारी महासंघाने प्रयत्न केले होते, असे मंत्रालयातील सूत्रांकडून समजते.

सकाळ पू. पान क्र. 2

# रस्त्यासाठी खारबावमध्ये आंदोलन

## कामण-चिंचोटी रस्तादुरुस्तीसाठी नागरिक आक्रमक

वसई, ता. २९ (बातमीदार) : वसई पूर्वेकडील कामण चिंचोटी रस्त्यांची चाळण झाली आहे. त्यामुळे येथील नागरिकांना मुंबई, भिवंडी, ठाणे येथे ये-जा करणाऱ्या वाहनचालकांना गैरसोय होत आहे. याबाबत नागरिकांतून रोष निर्माण झाला असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी खारबाव येथे आंदोलन करण्यात आले. ग्रामस्थ गाव विकास समितीच्या नेतृत्वाखाली खारबाव येथे रास्तारोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात वसईच्या नागरिकांनीही सहभाग घेत रस्ता दुरुस्त करण्याची मागणी केली.



वसई : रस्तादुरुस्तीसाठी खारबाव येथे आंदोलन करण्यात आले.

चिंचोटी ते कामण या मार्गावरून मुंबई, गुजरात, ठाणे येथील वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते; परंतु हा रस्ता नादुरुस्त असल्याने अनेक अपघात होत असतात. या रस्त्याची दुरवस्थेमुळे या भागात मोठी वाहतूक कोंडी होत आहे. सकाळी दहा वाजता सुरू झालेले आंदोलन एक तास सुरू राहिल्याने या मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने शाखा अभियंता परदेशी यांनी निवेदन स्वीकारून येत्या १५ मे पर्यंत रस्ता दुरुस्तीचे लेखी आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले.

कामण चिंचोटी मार्गाच्या दुरुस्तीबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आमदार हितेंद्र ठाकूर यांनी भेट घेऊन चर्चा केली. हा मार्ग लवकर दुरुस्त करावा अशी आमची मागणी आहे.

**- राजेश पाटील**, आमदार

नादुरुस्त रस्त्यामुळे रहिवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. औद्योगिक वसाहतीलाही फटका बसला आहे. अनेकदा याबाबत निवेदन देण्यात आले; परंतु जैसे थे परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे.

**- दिनेश म्हात्रे**, माजी सरपंच, कामण

CS CamScanner

Scanned with CamScanner

दि. 30/03/2023

सामना पान क्र.6

## पोलीस लेखी परीक्षा २ एप्रिलला

१२ हजार १२७ परीक्षार्थी

भाईंदर, दि. २९ (सा.वा.) – मीरा-भाईंदर व वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत पोलीस शिपाई पदांसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची २ एप्रिलला लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. लेखी परीक्षेसाठी एकूण १२ हजार १२७ पात्र उमेदवार असून त्यापैकी ३ हजार २६९ महिला व ८ हजार ८५८ पुरुष आहेत. भाईंदर पूर्वेच्या स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे मैदान या ठिकाणी महिलांची लेखी परीक्षा घेण्यात येणार असून पुरुषांची लेखी परीक्षा सुभाषचंद्र बोस मैदान येथे घेण्यात येणार आहे.

मीरा-भाईंदर व वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत पोलीस शिपाई व चालक पदांसाठी २ जानेवारीला थेट भरती प्रक्रियेला सुरुवात झाली होती. पोलीस आयुक्तालयाच्या स्थापनेनंतर प्रथमच थेट भरती होत आहे. ९९६ पदांच्या जागासाठी ही भरती प्रक्रिया राबवली जात आहे. या पदांसाठी सुमारे ७१ हजार अर्ज प्राप्त झाले होते. प्राप्त झालेल्या ७१ हजार ९५१ अर्जांमध्ये ५९ हजार ८४७ पुरुष व १२ हजार १०४ महिला उमेदवारांचा समावेश होता. मैदानी शारीरिक चाचणीमध्ये ३५ हजार ९५६ उमेदवार पात्र ठरले. यातील पोलीस चालक पदाची लेखी परीक्षा २६ मार्च रोजी झाली. आता पोलीस शिपाई पदासाठी २ एप्रिलला लेखी परीक्षा होत आहे.

लोकमत पान क्र.5

## पासपोर्टसाठी कागदपत्रांवर खाडाखोड

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : पासपोर्ट काढण्यासाठी महिलेने शाळेच्या जन्मदाखल्यामध्ये खाडाखोड करून तुळींज पोलिस ठाण्यात व्हेरिफिकेशन करण्यासाठी कागदपत्रे दिल्याची बाब उघडकीस आली आहे. गोपनीय विभागातील पोलिस हवालदार विक्रम पन्हाळकर (३६) यांनी सोमवारी तक्रार देऊन आरोपी महिलेविरोधात वेगवेगळ्या कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.

रहमत नगरमधील रॉयल गार्डनमध्ये राहणाऱ्या हलिमा आरिफ पियारजी यांनी पासपोर्ट काढण्यासाठी जोगेश्वरी येथील मदनी हायस्कूल या शाळेच्या दाखल्यामधील जन्मतारखेमध्ये खाडाखोड केली. पोलिस हवालदार विक्रम पन्हाळकर यांना संशय आला. त्यांनी या कागदपत्रांची पडताळणी केल्यावर ही बाब उघड झाली.

## बस चालकाला मारहाण

नालासोपारा : परिवहनच्या बस चालकाला रिक्षा चालकाने मारहाण केल्याची घटना वसईत घडली आहे. रानगाव येथे राहणारे वसई-विरार महापालिका परिवहन बससेवेत चालक म्हणून कार्यरत असलेले सागर हनुमंत मोटे (३०) हे सोमवारी दुपारी तीनच्या सुमारास वसईच्या फादरवाडी येथील इंडियन पेट्रोल पंप सिग्नलजवळ बस चालवीत असता, एका रिक्षा चालकाला बसचा धक्का लागल्याचा समज झाल्याने त्यांना शिवीगाळ करत बसमध्ये घुसून मारहाण केली होती. शासकीय कर्तव्यावर असताना सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी रिक्षा चालकाविरुद्ध वालीव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## लॉटरी लागल्याचे सांगत फसवणूक

नालासोपारा : कारची लॉटरी लागल्याचे आमिष दाखवून एका महिलेची आर्थिक फसवणूक करण्यात आल्याची घटना नालासोपारामध्ये घडली आहे. संगम अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या संगीता गुलाबचंद यादव (३५) या महिलेला आरोपी कैलास मुर्मू व गजानन सायनी यांनी २० फेब्रुवारीला मोबाइलवर फोन करून अल्टो कारची लॉटरी लागली असल्याचे आमिष दाखवून रजिस्ट्रेशन व टीडीएस चार्ज भरण्याच्या नावाखाली पतीच्या बँक खात्यातून ७० हजार रुपये घेऊन फसवणूक केली. मंगळवारी आचोळे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पू. पान क्र.1

## चोरट्याचा चाकूहल्ला

मीरा रोड : घोडबंदर मार्गावरील काजूपाडा येथे एका घरात चोरी करण्यास शिरलेल्या चोरास पकडण्याचा प्रयत्न केला असता चोराने चाकूने वार करून दोघांना जखमी केल्याप्रकरणी काशिमीरा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. काजूपाडा मराठी शाळेजवळ राहणारे अरुण वीर यांच्या घराचे टाळे दोघे चोर तोडत होते. सीसीटीव्हीमध्ये ते दिसून आले. मात्र, चोरांनी अरुण झोपलेल्या खोलीस बाहेरून कडी लावली होती. त्यांनी शेजारी राहणारे सासरे यांना कॉल करून मदतीसाठी येण्यास सांगितले. सासरे बाहेर आले असता चोर पळून जाऊ लागले. त्यानंतर बाहेर आलेल्या अरुण यांनी एकास पाठलाग करून पकडले. मात्र, चोराने चाकूने अरुण यांना चाकू मारला.

CS CamScanner

Scanned with CamScanner

दि. 30/03/2023

लोकसत्ता पृ. पान क्र. 3

# गुन्हे शाखेच्या पाच पोलिसांचा गौरव

## सर्वोत्कृष्ट तपासासाठी आयुक्तांकडून पुरस्कार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** मीरा-भाइंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयातर्फे दर महिन्याला गुन्ह्यांचा सर्वोत्कृष्ट तपास करणाऱ्या पोलिसांचा पोलीस आयुक्तांतर्फे पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. फेब्रुवारीतील सर्वोत्कृष्ट तपासाचे मानकरी गुन्हे शाखा १, २, ३ तसेच मध्यवर्ती गुन्हे आणि सायबर गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व कर्मचारी ठरले आहेत. मात्र, आयुक्तालयातील १६ पोलीस ठाण्यापैकी फक्त तुळिंज पोलीस ठाण्याला पुरस्कार मिळाला आहे.

शहरात टेम्पो चोरीच्या घटना वाढल्या होत्या. गुन्हे शाखा १ च्या पथकाने याप्रकरणी तपास करून एका आंतरराज्य टोळीला अटक केली. या टोळीकडून २२ गुन्हे उघडकीस आणून ५३ चोरीची वाहने जप्त करण्यात आली. वाहनचोरांविरोधातील ही सर्वात मोठी कारवाई होती. याप्रकरणी गुन्हे शाखा १ चे प्रमुख वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविराज कुऱ्हाडे, साहाय्यक पोलीस निरीक्षक पुष्कराज सुर्वे यांना सर्वोत्कृष्ट तपासाचा पुरस्कार देण्यात आला.

### एकमेव तुळिंज पोलीस ठाण्याचा सन्मान

शहरात १६ पोलीस ठाणी (नवीन नायगाव वगळून) आहेत. त्यापैकी फक्त तुळिंज पोलीस ठाण्याला सर्वोत्कृष्ट तपासाचा पुरस्कार मिळाला आहे. शहरातील पुलाखाली एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला होता. मात्र त्याची अपमृत्यू म्हणून नोंद न करता पोलिसांनी सखोल तपास करून ती हत्या असल्याचे उघडकीस आणले आणि आरोपीला अटक केली. याप्रकरणी तुळिंज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांचा सर्वोत्कृष्ट उकल केल्याप्रकरणी गौरव करण्यात आला.

नालासोपारामध्ये मेघा शाह ऊर्फ मेघा तोरवी हिची तिचा 'लिव्ह इन पार्टनर' हार्दिक शहा याने हत्या केली होती. त्यानंतर तिचा मृतदेह पलंगामध्ये लपवला होता. याप्रकरणी गुन्हे शाखा २ च्या पथकाने तपास करून आरोपीला मध्य प्रदेशातून अटक केली. या सर्वोत्कृष्ट तपासाबद्दल गुन्हे शाखा २ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शाहूजी रणावरे यांना गौरवण्यात आले.

नागरिकांना बँकेतून लिलावात मिळालेली घरे स्वस्तात विकून त्यांची फसवणूक करणाऱ्या टोळीला गुन्हे शाखा ३ च्या पथकाने अटक केली होती. या टोळीने विविध नावाने बनवाट कंपन्या उघडून ७२ नागरिकांना कोट्यवधींचा गंडा घातला होता. याप्रकरणी गुन्हे शाखा ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख यांना सर्वोत्कृष्ट तपासाचा पुरस्कार देण्यात आला.

एका अल्पवयीन मुलीचा इन्स्टाग्रामवर लैंगिक छळ केल्याची घटना मीरा रोड येथे घडली होती. आरोपी तंत्रकुशल असल्याने पकडला जाऊ नये, यासाठी डिस्पोजल ई-मेलचा वापर करत होता. तरी सायबर गुन्हे शाखेने सखोल तपास करून आरोपीला अटक केली. याप्रकरणी सायबर गुन्हे शाखेचे प्रमुख सुजितकुमार गुंजकर यांचा गौरव करण्यात आला. दुसरीकडे मध्यवर्ती गुन्हे शाखेने चोरीला गेलेले, गहाळ झालेले ५२ मोबाइल नागरिकांना परत मिळवून दिले आहेत. या कामगिरीबद्दल मध्यवर्ती गुन्हे शाखेचे प्रमुख राहुल राख यांचा सत्कार करण्यात आला.

सकाळ पृ. पान क्र.3

# मिरा-भाईंदर शहरामध्ये स्वच्छता रॅली

भाईंदर, ता. २९ (बातमीदार) : स्वच्छ सर्वेक्षण २०२३ व स्वच्छोत्सव २०२३ अभियाना अंतर्गत मिरा-भाईंदर महापालिकेने स्वच्छता उत्सव जागृती रॅलीचे आयोजन केले होते. शहरातील विद्यार्थी, नागरिक यांच्यात रोजच्या जीवनात शहरात कचरा होणार नाही, याबाबत जनजागृती करणे हा या रॅलीचा प्रमुख उद्देश होता. वस्ती स्तर संघ, महिला बचत गट, महिलांच्या सेवाभावी संस्था, स्वयंसेवी संस्था या रॅलीत सहभागी झाल्या होत्या.

कचरा वर्गीकरणाबाबत सर्वसामान्य नागरिकांमध्ये जागृती व्हावी, यासाठी ३० मार्चला जागतिक शून्य कचरा दिन साजरा होणार आहे. त्यासाठी शहराच्या विविध भागांमध्ये या स्वच्छोत्सव जागृती रॅली २०२३ चे आयोजन करण्यात आले होते. मिरा रोड येथील आयुक्त निवासापासून स्वच्छोत्सव जागृती रॅलीचा प्रारंभ झाला. आयुक्त दिलीप ढोले यांच्या हस्ते रॅलीला हिरवा झेंडा दाखविण्यात आला. आमदार प्रताप सरनाईक, गीता जैन, महापालिका स्वच्छ सर्वेक्षणाच्या ब्रँड ॲम्बेसिडर अभिनेत्री प्रिया मराठे यांनीही रॅलीला उपस्थिती लावली.

CS CamScanner

Scanned with CamScanner

# काशिमीरा पुलिस को मिली सफलता ; चोरी कर फरार शातिर चोर नालासोपारा से धर दबोचा गया

अजहर शेख : संवाददाता

*वसई ;* घरफोडी चोरी करने वाला शातिर चोर को काशिमीरा पुलिस स्टेशन की क्राइम डिटेक्शन टीम ने १० घंटे के अंदर खोजकर २३ लाख से अधिक का माल जप्त करने में सफलता अर्जित की है। यह कार्रवाई सी.पी मधुकर पांडेय व अतिरिक्त पुलिस कमिश्नर श्रीकांत पाठक के आदेशानुसार परिमंडल १ डीसीपी जयंत बजबले व एसीपी विलास सनाप के मार्गदर्शन में पी.आई संदीप कदम व क्राइम पी.आई विजय पवार की टीम ने की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने बुधवार को दी है, पुलिस ने बताया कि शिकायतकर्ता अकबर अली मोहम्मदअली चुडीहार, निवासी-बि.नं.६,डी.बी. ओझोन ठाकुर मॉल के पास, काशिमीरा, मिरारोड पुर्व में रहता है। २३ मार्च व २६ मार्च के दरम्यान शिकायतकर्ता अकबर रमजान के मौके पर चंद्र दर्शन के लिए मुंबई के गोरेगांव गया था, तभी अज्ञात चोर ने घर की खिड़की ग्रिल को काटकर, घर में घुसकर घर में रखा लकड़ी और लोहे की अलमारी से कुल २९३ ग्राम वजन (१४,६५,००० रुपये) सोने के आभूषण, एक किलो वजन



७०,००० रुपये चांदी का आभूषण व ०९,००,००० रुपये नगदी चोरी कर फरार हो गए। इस मामले में अकबर ने काशिमीरा थाने में अज्ञात चोर के खिलाफ एफआईआर दर्ज करवाया।पुलिस अधिकारी ने कहा कि, उक्त अपराध में अज्ञात अभियुक्तों का पता लगाकर अपराध का पर्दाफाश करने के संवंध में वरिष्ठ पी.आई संदीप कदम ने क्राइम डिटेक्शन टीम में एपीआई प्रशांत गांगुर्डे को आदेश दिया, उक्त अपराध में अभियुक्तों की अपराध प्रक्रिया से ऐसे अपराध करने वाले अपराधियों के बारे में जानकारी प्राप्त हुई, गुप्त प्राप्त सूचना के आधार पर आरोपी अब्दुल शेख ऊर्फ अब्दुल चिरा,(उम्र ४६ वर्ष, रा.रुम नं २११, आदर्श निवास, अलकापुरी, आचोला क्रॉस रोड, नालासोपारा) ने उक्त अपराध किया है, पुलिस ने कहा कि, वह एक राज्य में भागने के लिए तैयार था, एपीआई प्रशांत गांगुर्डे और उनकी टीम ने नालासोपारा रेलवे स्टेशन क्षेत्र में जाल बिछाया और आरोपी को गिरफ्तार कर लिया। पुलिस ने बताया कि उक्त गिरफ्तार आरोपी के पास से मौके पर ही अपराध की चोरी की राशि में से ०७,७५,७००/- नकद बरामद किया गया,साथ ही, जांच के दौरान १४,६५,०००/- रुपये मूल्य के २९३ ग्राम सोने के आभूषण और ७०,०००/- रुपये मूल्य के ८५० ग्राम चांदी के आभूषण भी चोरी का माल, यानी कुल मिलाकर २३,१०,००० रुपये का माल जब्त किया गया है। उपरोक्त आरोपी ऑन रिकॉर्ड आरोपी है और उसके विरुद्ध मुंबई, ठाणे, पालघर, अजमेर राज्य-राजस्थान क्षेत्र में चोरी के ४० से अधिक मामले दर्ज हैं, अपराध किए जाने के समय, आरोपी ने बिना कोई तकनीकी या भौतिक साक्ष्य छोड़े अपराध किया था, लेकिन अपराध करने के तौर-तरीकों का अवलोकन किया था। गुप्त मुखबिर से मिली सूचना के आधार पर काशिमीरा थाने की क्राइम डिटेक्शन टीम के अधिकारियों व कर्मचारियों ने मामला दर्ज होने के महज १० घंटे के भीतर ही आरोपी को गिरफ्तार कर लिया है।

Scanned with CamScanner

# गुन्हे शाखेच्या पाच पोलिसांचा गौरव

## सर्वोत्कृष्ट तपासासाठी आयुक्तांकडून पुरस्कार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** मीरा-भाईदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयातर्फे दर महिन्याला गुन्ह्यांचा सर्वोत्कृष्ट तपास करणाऱ्या पोलिसांचा पोलीस आयुक्तांतर्फे पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. फेब्रुवारीतील सर्वोत्कृष्ट तपासाचे मानकरी गुन्हे शाखा १, २, ३ तसेच मध्यवर्ती गुन्हे आणि सायबर गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व कर्मचारी ठरले आहेत. मात्र, आयुक्तालयातील १६ पोलीस ठाण्यापैकी फक्त तुळिंज पोलीस ठाण्याला पुरस्कार मिळाला आहे.

शहरात टेम्पो चोरीच्या घटना वाढल्या होत्या. गुन्हे शाखा १ च्या पथकाने याप्रकरणी तपास करून एका आंतरराज्य टोळीला अटक केली. या टोळीकडून २२ गुन्हे उघडकीस आणून ५३ चोरीची वाहने जप्त करण्यात आली. वाहनचोरांविरोधातील ही सर्वात मोठी कारवाई होती. याप्रकरणी गुन्हे शाखा १ चे प्रमुख वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविराज कुऱ्हाडे, साहाय्यक पोलीस निरीक्षक पुष्कराज सुर्वे यांना सर्वोत्कृष्ट तपासाचा पुरस्कार देण्यात आला.

### एकमेव तुळिंज पोलीस ठाण्याचा सन्मान

शहरात १६ पोलीस ठाणी (नवीन नायगाव वगळून) आहेत. त्यापैकी फक्त तुळिंज पोलीस ठाण्याला सर्वोत्कृष्ट तपासाचा पुरस्कार मिळला आहे. शहरातील पुलाखाली एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला होता. मात्र त्याची अपमृत्यू म्हणून नोंद न करता पोलिसांनी सखोल तपास करून ती हत्या असल्याचे उघडकीस आणले आणि आरोपीला अटक केली. याप्रकरणी तुळिंज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांचा सर्वोत्कृष्ट उकल केल्याप्रकरणी गौरव करण्यात आला.

नालासोपारामध्ये मेघा शाह ऊर्फ मेघा तोरवी हिची तिचा 'लिव्ह इन पार्टनर' हार्दिक शहा याने हत्या केली होती. त्यानंतर तिचा मृतदेह पलंगामध्ये लपवला होता. याप्रकरणी गुन्हे शाखा २ च्या पथकाने तपास करून आरोपीला मध्य प्रदेशातून अटक केली. या सर्वोत्कृष्ट तपासाबद्दल गुन्हे शाखा २ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शाहूजी रणावरे यांना गौरवण्यात आले.

नागरिकांना बँकेतून लिलावात मिळलेली घरे स्वस्तात विकून त्यांची फसवणूक करणाऱ्या टोळीला गुन्हे शाखा ३ च्या पथकाने अटक केली होती. या टोळीने विविध नावाने बनवाट कंपन्या उघडून ७२ नागरिकांना कोट्यवधींचा गंडा घातला होता. याप्रकरणी गुन्हे शाखा ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख यांना सर्वोत्कृष्ट तपासाचा पुरस्कार देण्यात आला.

एका अल्पवयीन मुलीचा इन्स्टाग्रामवर लैंगिक छळ केल्याची घटना मीरा रोड येथे घडली होती. आरोपी तंत्रकुशल असल्याने पकडला जाऊ नये, यासाठी डिसपोजल ई-मेलचा वापर करत होता. तरी सायबर गुन्हे शाखेने सखोल तपास करून आरोपीला अटक केली. याप्रकरणी सायबर गुन्हे शाखेचे प्रमुख सुजितकुमार गुंजकर यांचा गौरव करण्यात आला. दुसरीकडे मध्यवर्ती गुन्हे शाखेने चोरीला गेलेले, गहाळ झालेले ५२ मोबाइल नागरिकांना परत मिळवून दिले आहेत. या कामगिरीबद्दल मध्यवर्ती गुन्हे शाखेचे प्रमुख राहुल राख यांचा सत्कार करण्यात आला.

लोकसत्ता Thu, 30 March 2023
https://epaper.loksatta.com/c/72049530

Scanned with CamScanner

RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED

शब्दांना सत्याची धार

प्रहार

# काशिमिऱ्यात घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला अटक

◆ भाईंदर (वार्ताहर) :

रमजान उत्सवानिमित्त चंद्र दर्शनासाठी गेलेल्या कुटुंबाच्या घरी घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला काशिमिरा पोलिसांनी अवघ्या दहा तासांत अटक करून त्याच्याकडून २३ लाख १० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.



काशिमिरा भागातील डी. बी. झोन सोसायटीत राहणारे अकबर अली मोहम्मद अली चुडीहार हे रमजान उत्सवानिमित्त चंद्र दर्शनासाठी गोरेगाव येथे गेले असताना त्यांच्या घराच्या खिडकीचे ग्रील कापून अज्ञात इसमाने घरात प्रवेश करून कपाटातील २९३ ग्रॅम वजनाचे १४ लाख ६५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने, ७० हजार रुपये किमतीचे चांदीचे दागिने व ९ लाख रुपये रोख असा मुद्देमाल चोरी झाल्याची तक्रार काशिमिरा पोलीस ठाण्यात दाखल झाली. त्यावरून पोलीस आयुक्त मधुकर पाण्डेय, अपर पोलीस आयुक्त श्रीकांत पाठक, पोलीस उपायुक्त जयंत बजवळे, सहाय्यक पोलीस आयुक्त विलास सानप यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप कदम,पोलीस निरीक्षक विजय पवार, स.पो. नि. प्रशांत गांगुर्डे, जावेद मुल्ला, प्रकाश कावरे, सागर साबळे,अर्चना जाधव, अनिल पवार, सचिन हुले, निलेश शिंदे, सुधीर खोत, राहुल सोनकांबळे, संतोष तायडे, रविंद्र कांबळे, शरद नलावडे, प्रविण ठोंबरे, जय प्रकाश जाधव यांनी तपास करत आरोपीच्या गुन्हे कार्य पध्दतीवरून अशाकारचे गुन्हे करणाऱ्या इसमांची माहिती घेतली. मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे अब्दुल शेख ऊर्फ अब्दुल चिरा (वय ४६), याला नालासोपारा येथून ताब्यात घेतले त्यावेळी तो परराज्यात पळून जाण्याच्या तयारी होता. त्याच्याकडून ७ लाख ७५ हजार ७०० रूपये रोख रक्कम जागीच हस्तगत करण्यात आली.

तपासादरम्यान चोरीस गेलेले १४ लाख ६५ हजार रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने, ७० हजार रुपये किंमतीचे चांदीचे दागिने हस्तगत करण्यात आले. सदर आरोपी सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध मुंबई, ठाणे, पालघर, अजमेर राजस्थान या परिसरात घरफोडीचे ४० हून अधिक गुन्हे दाखल आहेत.

Mumbai Edition
Mar, 30 2023 Page No, 4

Scanned with CamScanner

# साडेचार लाखांच्या अमली पदार्थांसह दोघांना अटक

भाईंदर (वार्ताहर) : काशिमिरा भागातील सर्विस रोडवर संशयास्पद स्थितीत उभ्या असलेल्या दोघा इसमांची चौकशी करून त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडे २२ किलो ८० ग्रॅम वजनाचा ४ लाख ४१ हजार ६०० रुपये किमतीचा विक्रीसाठी आणलेला 'गांजा' हा अमली पदार्थ मिळाला. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे. मीरा रोड परिसरात अमली पदार्थांची खरेदी-विक्री करणाऱ्यांवर लक्ष केंद्रित करण्याचे आदेश मिळाल्याने पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे, सहाय्यक पोलीस आयुक्त अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली, अमली पदार्थविरोधी कक्षाचे पोलीस निरीक्षक अमर मराठे हे आपल्या पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल अंबावणे, विलास कुटे, टक्के, घरबुडे यांच्यासह मीरा रोड परिसरात गस्त करीत असताना काशिमिरा नाक्याकडे येणाऱ्या सर्विस रोडवर दोन इसम संशयास्पद स्थितीत उभे असल्याचे दिसले.



Scanned with CamScanner

लोकमत

# डेटिंग, चॅटिंग ॲपवर सुंदर चेहरे, मधुर आवाज

## तरुणांसह वृद्धांचीही होते फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : इंटरनेटच्या माध्यमातून विविध सोयी-सुविधा पुरवणारा मोबाइल आर्थिक आणि चारित्र्याच्या दृष्टिकोनातून अतिशय धोकादायक बनला आहे. अनेकांना विविध ऑनलाइन डेटिंग आणि चॅटिंग ॲपवरील सुंदर चेहरे आणि मधुर आवाजाची भुरळ पडून आर्थिक नुकसानीसोबतच चारित्र्यावर डाग लागण्याच्या घटनांचा सामना करावा लागत असल्याचे प्रकार उघडीस येत आहेत.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयांतर्गत सायबरविषयक तक्रारींची चौकशी व सायबर गुन्ह्यांच्या तपासाकरिता गुन्हे शाखेंतर्गत सायबर गुन्हे कक्ष कार्यरत आहे. या विभागाने २०२२ या वर्षात उल्लेखनीय कामगिरी करत २,७३८ प्रकरणात फसवणूक झालेली तब्बल ९१ लाख १४ हजार ८३३ रुपये पीडितांना परत केले आहे. काही वर्षांपूर्वी केवळ संभाषणासाठीच असलेल्या मोबाइलमध्ये गेल्या चार-पाच वर्षांत आमूलाग्र बदल झाले असून मोबाइलचे संगणकीकरण होऊन इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे विविध ॲप्सच्या माध्यमातून सेवा-सुविधा मिळू लागल्याने मोबाइल हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. मात्र, इंटरनेटवर विविध गोष्टींसाठी उपलब्ध असलेल्या हजारो ॲपच्या माध्यमातून आर्थिक फसवणुकीला पेव फुटलेले दिसत आहे.

## सायबरतज्ज्ञ काय सांगतात?

### प्रोफाइल फोटो

ऑनलाइन डेटिंग ॲपवर अनोळखी व्यक्तीशी संपर्क साधणारे सायबर भामटे नेहमी बनावट व सुंदर प्रोफाइल फोटो वापरतात. रिव्हर्स इमेज सर्चद्वारे ही गोष्ट ओळखता येऊ शकते.

### बँक खाते माहिती

अनोळखी व्यक्ती उत्पन्नाच्या माहितीविषयी रस दाखवत असेल तर अशा लोकांपासून सावध राहणे आवश्यक आहे. कोणालाही आपले बँक खाते तपशील, क्रेडिट, डेबिट कार्ड, मोबाइल ॲपचे कोड कोणालाही सांगू नये.

Hello Vasai
Page No. 2 Mar 29, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

# फर्जी सर्टिफिकेट से बनवाया पासपोर्ट

■ **निसं, नालासोपाराः** तुलिंज पुलिस ने फर्जी सर्टिफिकेट के आधार पर अपना पासपोर्ट बनवाने वाली एक महिला के खिलाफ भादंवि की विभिन्न धाराओं के तहत मामला दर्ज किया है। पासपोर्ट विभाग में महिला ने स्कूल का फर्जी सर्टिफिकेट जमा कराया था। पुलिस अब शहर में सक्रिय फर्जी दस्तावेज बनाने वाले गिरोह का पता लगाने में जुटी है।

जानकारी के अनुसार, रहमत नगर में रहनेवाली महिला हलीमा आरिफ पियारजी ने एक महीने पहले अपना पासपोर्ट बनवाने के लिए पासपोर्ट विभाग में अप्लाई किया था। 9 मार्च को जब उसकी फाइल तुलिंज पुलिस स्टेशन में वेरिफिकेशन के लिए आई, तो दस्तावेजों की पड़ताल में उसका स्कूल सर्टिफिकेट नकली पाया गया। महिला की जन्म तारीख में छेड़छाड़ की गई थी। पुलिसकर्मी विक्रम पन्हालकर की शिकायत पर हलीमा के खिलाफ धोखाधड़ी का मामला दर्ज किया गया है।

**पुलिस ने किया महिला पर धोखाधड़ी का मामला दर्ज**

Scanned with CamScanner